Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near e-Balbharti, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए
फा.प्लॉ.नं.१७८,१७९, ई बालभारती शेजारी, आगरकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा-५/ 2038
पुणे-४११००४
दि.- १३/०५/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:-फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेच्या निकालानंतर राज्य मंडळ स्तरावर नियुक्त केलेल्या समुपदेशकांची समुपदेशन सेवा सुरू ठेवल्याबाबत...

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा निकाल शनिवार दि. ०२/०५/२०२६ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आलेला आहे.

१. निकालानंतर राज्य मंडळ स्तरावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्यासाठी online समुपदेशन सेवा परीक्षेच्या निकालाच्या दिवसापासून ८ दिवस सुरु ठेवण्यात आलेली आहे. यासाठी १० समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर समुपदेशकांचे भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत. सदर मोबाईल नंबर मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) ९९६०६४४४११ | २) ७९७२५७३७४२ | ३) ९८३४०८४५९३ | ४) ९३५९९७८३१५ |
| ५) ८१६९२०२२१४ | ६) ९३७१६६१२५५ | ७)७२०८४२९३८१ | ८) ७७०९१५६०६८ |
| ९) ८४२११५०५२८ | १०) ९४०४७८३९९६ | | |

२. याशिवाय टेलीमानस हेल्पलाईन नं.१४४१६ व मनोदर्शन हेल्प लाईन ८४४८४४०६३२ या हेल्पलाईनवरही समुपदेशन सेवा उपलब्ध आहे.

३. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांचे मार्फत ३१५ समुपदेशकांची सेवा पुरवण्यात आलेली आहे. त्यांचे मोबाईल नंबर व पत्ते मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

उपरोक्त प्रमाणे मंडळाकडून व SCERT कडून करण्यात आलेली कार्यवाही सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक असल्याने सदर बाब आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांना संबंधीतांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत सूचित करावे. तसेच सदर माहिती विभागीय मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी.

त्याचप्रमाणे फेब्रु.-मार्च २०२६ च्या इ. १० वी परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाल्यानंतरही उपरोक्त प्रमाणे बाब सर्व माध्यमिक शाळा यांना संबंधीतांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत सूचित करावे.

(मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने)

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

---

क्र. कोविमं./आस्थापना/समुपदेशन/१७०४
दिनांक : १४/०५/२०२६

प्रति,

सर्व प्राचार्य व मुख्याध्यापक,
सर्व क. महाविद्यालये व माध्यमिक शाळा. (सातारा, सांगली व कोल्हापूर)

सर्व प्राचार्य व मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्र आपल्या क. महाविद्यालयातील/माध्यमिक शाळेतील सर्व संबंधित विद्यार्थी व पालक यांचे निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही करणेत यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर